The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# मराठी संतांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व

**प्रा. डॉ. बबन अण्णासाहेब गित्ते**
कै.सौ. शेषाबाई सीताराम मुंढे, कला महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी. पिन-४३१५१४.

**प्रास्ताविक** :

महाराष्ट्राला संतांची मोठी व दीर्घ परंपरा लाभलेली आहे. म्हणूनच, महाराष्ट्राला 'संतांची भूमी' असे म्हटले जाते. संत हे समाजाला दिशादर्शक असतात. त्यांचा मार्ग हा सत्य आचरणाचा असतो. मराठीत अनेक संत होऊन गेले. त्यांच्या आपल्या व्यक्तित्व व कर्तृत्वाने सकलजन शहाणे करुन सोडले. अशा या दिशादर्शक संतांचे व्यक्तित्व व कर्तृत्व समाजाला समजावे या उद्देशाने मी 'मराठी संतांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व' या विषयावर शोधनिबंध लिहिला आहे. वारकरी सांप्रदायिक भगवत् भक्तांना संत, वैष्णव, दास, वारकरी, माळकरी अशा नावांनी संबोधले जाते. मराठीत होऊन गेलेल्या संतांच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा ठसा आजही मराठी माणसांच्या मनात कोरलेला आहे. मराठीत संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत सेना न्हावी, संत गोरा कुंभार यांच्यासह अन्य संत कवयित्रींनी आपल्या कार्यकर्तृत्वाने महाराष्ट्राच्या मातीला सुगंधित केले आहे. मात्र, शोधनिबंधाच्या शब्दमर्यादेमुळे काही संतांच्या व्यक्तित्व आणि कर्तृत्वावर मी प्रस्तुत शोधनिबंधातून संशोधनात्मक दृष्टीने प्रकाश टाकणार आहे.

'संत' ही संकल्पना व्यापकस्वरुपाची आहे. त्याचे संदर्भ महाभारताच्या वनपर्वात आढळतात. मात्र, मध्ययुगीन काळात साहित्य व समाजात 'संत' या शब्दाला विवक्षित अर्थ प्राप्त झाला. या कालखंडातील साहित्यात सज्जन, सदाचारी, साक्षात्कारी, महात्मा, व्यक्तींना 'संत' ही पदवी देण्यात आली. या संदर्भात डॉ. रा.रा. गोसावी म्हणतात की, "भक्तीतच मुक्तीचे ऐश्वर्य ज्यांनी अनुभवले आणि मार्गाधारे वर्तून 'बुडती हे जन, न देखवे डोळा' या कळवळ्याने ज्यांनी आापल्या कृती-उक्तींना लोकाभिमुख केले, ते संत."१ यावरुन असे म्हणता येते की, संतांच्या अंगी सदाचार वृत्ती असणे आवश्यक आहे. तसेच नीतिमत्ता, नीतिमूल्ये जोपासणारी व्यक्तीच संतपदाला पोहोचते.

**संत ज्ञानेश्वर** :

संत ज्ञानेश्वर यांचा जन्म इ.स. १२७५ मध्ये झाल्याचे मानले जाते. वडील विठ्ठलपंत हे आपेगावचे धर्मश्रद्ध गृहस्थ म्हणून परिचित होते. आई रुक्मिणबाई. ज्ञानेश्वरांनी इ.स.१२९६ मध्ये समाधी घेतली. त्यांना अवघे २१ वर्षांचे आयुष्य लाभले असले तरी या अल्पावधीतच त्यांनी जे साहित्यविषयक व सांस्कृतिक कार्य केले ते अविस्मरणीय स्वरुपाचे आहे. ज्ञानेश्वरांनी भागवत संप्रदायाची स्थापना करुन अठरापगड जातीतील लोकांना एका झेंड्याखाली आणण्याचे महनीय कार्य केले. संत ज्ञानेश्वरांना अत्यंत कठीण प्रसंगांना तोंड द्यावे गाले. तरी ते यत्किंचितही डगमगले नाहीत. मात्र, त्यांनी जे साहित्य निर्माण केले त्यावर मात्र छळ, हालअपेष्टा, उपेक्षा यांचा थोडाफारही प्रभाव पडल्याचे दिसत नाही. यातूनच संत ज्ञानेश्वरांचे श्रेष्ठत्व सिद्ध होते.

ज्ञानेश्वरांचे जीवनचरित्र जेवढे अलौकिक आहे तेवढेच ते लौकिकही आहे. ज्ञानेश्वरकालीन समाजात धार्मिक अराजक सुरुच होते. अशा या असंतोषजनक परिस्थितीत ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाला आपल्या नाथ पंथाचे तत्त्वज्ञान देऊन भागवत धर्माची उभारणी केली. भागवत धर्माच्या झेंड्याखाली सर्व धर्मियांना एकत्रित करुन सामाजिक ऐक्य साधण्याचा पहिला प्रयत्न ज्ञानेश्वरांनी केला. ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' च्या समारोपातच आपल्या गुरुपरंपरेचा व जीवनकार्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे. ज्ञानेश्वरांच्या जीवनचरित्राचे यथार्थ अभ्यास करण्यासाठी ज्ञानेश्वरकालीन समाजस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. या संदर्भात डॉ. ल.रा. नसीराबादकर म्हणतात की, "कोणत्याही कलाकृतीचे अथवा विचारवंतांच्या कार्याचे यथार्थ आकलन होण्यासाठी तत्कालीन समाजस्थिती लक्षात घेणे आवश्यक असते. कारण, तो कवी वा विचारवंत आपल्या काळाचा आणि समाजाचा प्रतिनिधी असतो. त्याचे विचार अथवा कलाकृती जितकी स्वतंत्र असते तितकीच ते समाजसापेक्ष आणि कालसापेक्षही असते. म्हणून ज्ञानेश्वरांच्या काव्यनिर्मितीमागील प्रेरणा ज्या परिस्थितीत घडल्या होत्या ती समजावून त्यांच्या काव्याचे आणि कार्याचे मर्म अधिक यथार्थपणे आकलन होऊ शकेल"२ यावरुन असे म्हणता येईल की, ज्ञानेश्वरांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करताना त्यांच्या काळची समाजस्थिती कशी होती, याचे आकलन होणे गरजेचे आहे. हे डॉ. ल.रा. नसीराबादकर यांचे मत योग्य वाटते.

**ज्ञानेश्वरांचे कर्तृत्व** :

संत ज्ञानेश्वरांचे जीवनचरित्र जसे अलौकिक आहे तसेच त्यांचे कार्यकर्तृत्वही अलौकिक स्वरुपाचे असेच आहे. गीता हा तत्त्वज्ञानपर ग्रंथ परंतु 'ज्ञानेश्वरी' हा साहित्य ग्रंथ असूनही आशयाच्या दृष्टीने तत्त्वज्ञानपर ग्रंथ ठरतो. ज्ञानदेव हे अलौकिक प्रतिभेचे तत्त्वज्ञ कवी असल्याने ज्ञानेश्वरीत काव्य व तत्त्वज्ञानच मनोज्ञ समन्वय पहावयास मिळतो. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव, 'चांगदेव पासष्टी', 'ज्ञानदेवांचे अभंग' इ. ग्रंथ लिहिले आहेत. 'चांगदेव पासष्टी' या ग्रंथाबद्दल के.ल. टेंभूर्णीकर म्हणतात की, "ज्ञानदेवांच्या वाग्विलास रम्य व त्यातल्या त्यात चांगदेवांच्या भूमिकेवर असणाऱ्यास व मुमुक्षासही ही पासष्टी अत्यंत रम्य व हितपरिणामकारक होय. कारण वेदांताचे रहस्य जे अध्यात्मज्ञानाचे तत्त्व ते ज्ञानदेवांनी पासष्ट ओव्यांच्याद्वारे समजावून सागितले. उपनिषदे, भगवत गीता व वेदांत सूत्र यातील सार मायभाषेत म्हणजे मराठीत सांगितले."[3] यावरुन असे म्हणता येते की, उपरोक्त ग्रंथातून ज्ञानेश्वरांनी चांगदेवास पाठविलेल्या पत्रातून दिलेले उत्तर म्हणजे 'चांगदेव पासष्टी' हा ग्रंथ होय. ज्ञानेश्वरांनी आापल्या सर्वच ग्रंथांमधून माणसाला माणसासारखे वागावयाला शिकविणारे ज्ञान आहे. मानवाचा महामानव करण्याचे सामर्थ्य ज्ञानेदवांच्या छबित आणि वाणीत आहे.

**संत नामदेव** :

संत नामदेव हे वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ संत म्हणून ओळखले जातात. सगुण भक्तीत रमून, समाजाला मानवतेची उपासना शिकवून, भागवत धर्माची पताका पंढरीपासून पंजाबपर्यंत नेणाऱ्या संत नामदेवांचे व्यक्तिमत्व हे भाववेडे आहे. आपल्या सुमधूर व रसाळ अभंगवाणीने त्यांनी जनसामान्यांशी सख्यत्व जोडले. त्यांची अभंगवाणी ही भाववेड्या, उदात्त, प्रसन्न, सोज्वळ आणि निष्पाप अशा व्यक्तिमत्वाचा आविष्कार होय. अभंगांचे भांडार निर्मिलेल्या संत नामदेवांच्या जन्म,

स्थलकालाबाबत अनेक मतमतांतरे असल्याचे दिसून येते. संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर हे समकालीन संत होत. त्यांना एकमेकांविषयी स्नेह होता. संत नामदेव हे मराठी वाङ्.मय सृष्टीतील पहिले चरित्रकार मानले जातात. कारण, त्यांच्या चरित्रपर अभंगांची संख्या जवळपास १५० एवढी असून त्यातून त्यांनी आदि व तीर्थावळी प्रकरणांतून ज्ञानेश्वरांदि भावंडांसह त्यांचे माता-पिता यांचेही चरित्र अभंगातून लिहिले तसेच स्वत:चे आत्मचरिरत्रही लिहिले आहे.

मराठीतील पहिले भावकवी, पद्य चरित्रकार, आत्मचरित्रकार, आख्यानकवी, भागवत धर्माचे पहिले संघटक आणि प्रचारक, कीर्तनपरंपरेचे प्रवर्तक अशा अनेक दृष्टींनी संत नामदेवांचे व्यक्तिमत्व संपन्न आहे. संत नामदेवांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला आकार दिला. या संदर्भात हे.वि. इनामदार म्हणतात की, "नामदेव हे थोर भक्त होते. तसेच ते कुशल संघटकही होते. वारकरी संप्रदायाच्या संघटनेचे कार्य त्यांनी ज्ञानेश्वरांच्या हयातीत तर केलेच, पण ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतरही पन्नास वर्षे महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर नामदेवांनी विठ्ठलभक्तीचा ध्वज फडकविला."४ यावरुन असे म्हणता येते की, इनामदार यांच्या मतावरुन संत नामदेवांच्या व्यक्तित्वावर पुरेपूर प्रकाश पडतो. तसेच संतांची अभंगवाणी ही उत्कृष्ट भावकविता आहे, याची पहिली प्रचीती नामदेवांच्या अभंगवाणीतून दिसते.

**संत नामदेवांचे कर्तृत्व :-**

संत नामदेव हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे व ज्येष्ठ संत होत. त्यांचे व्यक्तित्व जसे उत्तुंग आहे त्याचप्रमाणे त्यांचे कर्तृत्वही अलौकिक असेच आहे. आपल्या ग्रंथरचनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात समाजप्रबोधन केले आहे. संत नामदेव हे अलौकिक प्रतिभेचे संत होते. त्यांच्या नावावर जवळपास अडीच हजार अभंग आहेत. त्यांच्या अभंगांविषयी शं.गो. तुळपुळे म्हणतात की, "नामदेवांची काव्यविषयक आत्मविस्मृती काही अपूर्व आहे. काव्यदृष्टी किंवा काव्यध्येय असे त्यांना नाहीच. एकमेकास हिताच्या गोष्टी सांगून सावध करावे, विश्वाचे शोक, मोह निरसावे, हरिनामाच्या महिमा गावा, भक्ती वाढवावी आणि हरिदासांना आकल्प आयुष्य व संतमंडळीस सुख चिंतावे यापरता अन्य हेतू मनात ठेऊन नामदेवांनी ग्रंथरचना केलेली नाही."[५] यावरुन असे स्पष्ट होते की, नामदेवांच्या अंतरंगाचे अत्यंत स्वच्छ व नितळ प्रतिबिंब त्यांच्या अभंगवाणीत पहावयास मिळते. संत नामदेवांनी संत नामदेव अभंगवाणी, आत्मचरित्ररुप अभंग, चरित्र, आत्मनिवेदनपर अभंग, बाळक्रीडेचे अभंग अशी विपुल रचना केलेली आहे.

एकूणच संत नामदेवांनी आपल्या काव्यनिर्मितीच्या आणि कर्तृत्वाच्याद्वारे समाजाला मानवता, भूतदया, शांती, सर्वांभूती प्रेमभाव, संतमाहात्मातून आदर्श व्यक्ती आणि भक्त यांची महती शिकविली. तसेच विविध प्रदेशात जाऊन तेथील लोकभाषेत रचना केली. शीख धर्माच्या पवित्र 'श्रीगुरुग्रंथसाहिब' या ग्रंथात नामदेवांच्या अभंगाचा समावेश आहे. यावरुन त्यांच्या कर्तृत्वाची उंची किती विशाल होती, हे समजते. संत नामदेवांनी नामसंकीर्तनाची नवी परंपरा सुरु केली आणि वारकरी संप्रदायाला प्रभावशाली बनविले.

**संत एकनाथ :**

संत एकनाथ हे वारकरी संप्रदायातील अत्यंत महत्वाचे संत. संत बहिणाबाईंनी भागवत मंदिराचे वर्णन करताना,

'जनार्दनी एकनाथ | खांब दिला भागवता ||'

असे म्हटले आहे. यावरुन संत एकनाथांचे वारकरी संप्रदायातील योगदान अधोरेखित होते. संत एकनाथ यांचा जन्म इ.स.१५३३ मध्ये पैठण येथे झाला. त्यांचे गुरु जनार्दन स्वामी हे दत्तसंप्रदायी असले तरी एकनाथांच्या घरात वारकरी संप्रदायाची परंपरा चालत होती. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्यापेक्षा एकनाथांच्या काळात महाराष्ट्रातील परिस्थिती अधिकच बिकट होती. दु:ख, दारिद्रय व अज्ञान समाजात मोठ्या प्रमाणात वाढले. संत एकनाथांनी बालपणापासूनच समाजात वाढत चाललेल्या प्रथा, परंपरा, अनिष्ठ चालीरीती, व्रतवैकल्ये, जातीयता, अस्प्रश्यता, वर्णव्यवस्था पाहिली होती. याचा त्यांच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला. त्यातून ते चिंतन करु लागले. अशा अस्वस्थ मन:स्थितीत त्यांनी वयाच्या बाराव्या वर्षी श्री जनार्दन स्वामींचे शिष्यत्व पत्करले. संत एकरनाथांना गुरुचा अनुग्रह लाभल्यामुळे ते आत्मसाधना करु लागले. सगुणाकडून निर्गुणाकडे जाण्याचा मार्ग शोधला. आपल्या गुरुविषयी असलेला कृतज्ञभाव व्यक्त करताना म्हणतात की,

माझी जनार्दन माऊली | प्रेमपान्हा पान्हावली
तीच नित्य मज सांभाळी | रात्रंदिवस सर्वकाळी ||

संत एकनाथांनी अशा प्रकारे आपल्या गुरुविषयीचा आत्मभाव प्रगट केला आहे. अशा या थोर संतांचे उत्तमोत्तम अशी ग्रंथरचना केली आहे.

**संत एकनाथांचे कर्तृत्व** :

संत एकनाथ हे संत लोकहितोपदेश करणारे संत असून त्यांनी आपले विचार व्यक्त करण्यासाठी त्रिविध पद्धतीची रचना केलेली आहे. समाजातील पंडित व विद्वानांसाठी 'चतु:श्लोकी भागवत' व 'एकनाथी भागवत' या ग्रंथाचे लेखन केले आहे. तर मध्यमवर्गीय समाजासाठी 'रुक्मिणी स्वयंवर' आणि 'भावार्थ रामायण' लिहिले तर सर्वसामान्य नागरिकांसाठी 'भारुड' या प्रकारात लेखन केलेले दिसते. उच्चवर्णीयांपासून ते कनिष्ठ वर्गापर्यंत ज्ञान पोहोचविण्याचे कार्य संत एकनाथांनी केले. आपले तत्त्वज्ञान लोकभाषेत सांगून लोकशिक्षण देणारे ते पहिले संत होते. 'चतु:श्लोकी', 'एकनाथी भागवत', 'रुक्मिणी स्वयंवर', 'भावार्थ रामायण', 'स्फुट प्रकरणे', 'नाथांची पदे आणि गौळणी', 'भारुड', आदी रचना नाथांच्या नावावर आहे.

संत एकनाथांना मराठी भाषेचा अभिमान होता. हा भाषाभिमान त्यांच्या अनेक ओवीतून प्रकट झाला आहे. एका ओवीत ते म्हणतात की,

"श्री भागवत आणि भाषे मराठी | हे बोलणे नवल वाटे
पूर्वी नाही ऐकिले कोठे | अभिनव मोठे धिटावा केला ||[६]"

यासारख्या ओवीतून त्यांचा भाषेविषयी असलेला अभिमान प्रकट झाला आहे. पण त्यातून ध्वनित होणारा संस्कृतनिष्ठ पंडितांचा उपहास मनोवेधक अशा स्वरुपाचा आहे.

एकूणच संत एकनाथ यांची ग्रंथसंपदा ही अष्टपैलू स्वरुपाची आहे. मराठी संतकवींमध्ये एवढी विविधतापूर्ण वाड्.मयीन कामगिरी फक्त नाथांचीच आहे, असे म्हणता येते. नाथांनी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत समन्वय घडविला. म्हणून त्यांना 'समन्वयकार' संत एकनाथ असेही म्हटले जाते.

**संत तुकाराम** :

संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया रचला व त्या इमारतीचा कळस होण्याचे भाग्य संत तुकाराम महाराज यांना लाभले. संत तुकाराम यांचे अभंग आजही सर्वसामान्यांना तोंडपाठ आहेत. त्यांचे लौकिक व पारलौकिक जीवन त्यांच्या अभंगवाणीतून अविष्कृत झाल्याचे दिसते. संत तुकाराम यांच्या अभंगांतूनन बहुजन समाजाच्या कळवळ्याची तीव्र जाणीव होते. त्यांना बहुजन समाजाविषयी नेहमीच जिव्हाळा वाटत राहिला आहे. संत तुकाराम यांचा जन्म इ.स.१५९८ मध्ये देहू येथे झाला. घरात विठ्ठलाची अपार भक्ती होती. त्यांच्यात व्यवहारबुद्धी आणि व्यवहार कुशलता होती. संसारात अनेक संकटे आल्यामुळे संत तुकारामांनी ऐन तारुण्यात संकटांचा सामना करावा लागला. याचे चित्रण तयांच्या अभंगात वास्तवपणे आले आहे. जीवनातील दु:खाला अभंगातून वाट करुन दिली तसेच बहुजन समाजाचे चित्रणही त्यांनी अनेक अभंगांतून केले आहे.

संत तुकारामांचे संपूर्ण नाव तुकाराम बोल्होबा आंबिले संत तुकारामांचे घराणे प्रतिष्ठित, श्रीमंत होते. घराण्यात वंशपरंपरेने चालत आलेली महाजनकी होती. संत तुकारामांचे बालपण आई-वडिलांच्या छत्रछायेत आनंदात गेले. अगदी बालवयातच त्यांच्यावर घराची जबाबदारी आली. 'सुखी, संपन्न असलेल्या घराण्याला दृष्ट लागली व संकटांची मालिका सुरु झाली. आई-वडिलांचे निधन झाले. त्यामुळे त्यांचा मोठा आधार गेला. वडील भाऊ सावजीची पत्नी गेली. सावजी विरागावस्थेत तीर्थाटनाला गेला. दुष्काळ पडला. गुरेढोरे मेली. सावकारी गेली, बायको रखमाबाई व मुलगा संतू अन्नावाचून गेली. एवढे मोठे संकट त्यांच्यावर कोसळले. आपले हे दु:ख पंढरीच्या विठ्ठलाजवळ व्यक्त करताना संत तुकाराम महाराज म्हणतात की,

"बाईल मेली मुक्त झाली | देवे माया सोडविली ||१||
विठो तुझे माझे राज्य | नाही दुसऱ्याचे कान ||२||
पोर मेले बरे जाले | देवे माया विरहित केले ||३||
माता मेली मज देखता | तुका म्हणे हरली चिंता ||४||"[७]

यावरुन असे म्हणता येते की, संत तुकारामांचे व्यक्तित्व हे समाजकल्याणार्थ वाहिलेले असले तरी त्यांच्या जीवनात अनेक दु:ख, संकटे आली. यातूनच त्यांचे व्यक्तित्व अधिक कणखर बनले. आणि आलेल्या संकटांना खंबीरपणे तोंड दिले, असे म्हणता येईल.

**संत तुकारामांचे कर्तृत्व** :

संत तुकाराम यांचे व्यक्तित्व जसे संघर्षमय राहिले तसे त्यांचे कर्तृत्वही अनेक अर्थांनी लक्षात राहण्याजोगे आहे. त्यांनी रचलेले अभंग आजही सर्वसामान्य अशिक्षितांच्या तोंडी ओहत. यातूनच त्यांच्या मधुर, रसाळ ग्रंथरचनेचा प्रत्यय येतो. सामान्यांना समाजातील अशा सोप्या व लोकभाषेत त्यांनी अभंगरचना केली आहे. 'संत तुकाराम गाथा' हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ होय. इतर कोणत्याही

प्रकारात लेखन करण्याऐवजी तुकारामांनी अभंगांतूनच उपदेश, तत्त्वज्ञान, संत माहात्म्य, वेदप्रामाण्य, सगुण-निर्गुण विचार, अद्वैतविचार, जीवविचार, जगतविचार, विठ्ठल माहात्म्य, पंढरी माहत्म्य, आदि विषयी परखड भाषेत विचार मांडले आहेत.

एकूणच संत तुकारामांनी राजा-रंक, लहान-मोठे, संन्यासी-संसारिक अशा सर्वांना आपल्या अभंगातून उपदेश केला आहे. त्यांची अभंगवाणी म्हणजे एक अमर भक्तिकाव्य आहे. ती अखंड अमृतवाणी आहे. संत तुकारामांनी आपल्या अभंगवाणीने सर्वहारा समाजाला शहाणे करुन सोडले व ढोंगी माणसांना फटके ओढले आहेत.

**संत चोखामेळा** :

संत चोखामेळा यांचा जन्म मंगळवेढा येथे झाला. चोखोबाचे बालपण व तरुणपण मंगळवेढ्यात गेले. संत ज्ञानेश्वर व इतर संतांनी मायबोली मराठीतून अभंगरचरना केली व सर्वसामान्यांना शहाणे करण्याचा प्रयत्न केला. अठरापगड जातींना एकत्रित करुन भागवत भक्तीचा मळा फुलविला. पण काही कर्मठ उच्चवर्णीयांनी स्पृश्य-अस्पृश्यांची दरी अधिक रुंद केली. त्यामुळे चोखामेळा यांना अनेक वेळा मानहानीला सामोरे जावे लागले. संत चोखामेळा यांची अभंगवाणी ही समाजातील उपेक्षित, शोषित, हे विठ्ठलभक्तीची आत्मकहाणी आहे. संत चोखामेळा यांना संत नामदेवांच्या सहवासात स्वर्गीय आत्मसुख लाभले. त्यांच्यामुळेच चोखामेळ्याचे जीवन पारमार्थिक व भक्तिमय झाले. संत चोखामेळा हीन जातीत जन्मल्यामुळे त्यांना समाजजीवनात दुय्यम वागणूक मिळाली. संत चोखोबांची अभंगवाणी ही त्यांच्या वृत्तीचा, भक्तीचा, दु:ख, यातनांचा आत्मविष्कार आहे.

**संत चोखामेळा यांचे कर्तृत्व** :-

संत चोखामेळा यांची अभंगरचना काळजाला भिडणारी आहे. हीन जातीत जन्मल्यामुळे त्यांना अनंत यातना सहन कराव्या लागल्या. पण ते डगमगले नाहीत. त्यातून त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले. त्यांची अभंगरचना म्हणजे त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा उत्तुंग मिलाफ होय. पंढरपुरच्या विठ्ठलाचा महिमा वर्णन करताना संत चोखामेळा म्हणतात की,

"विठ्ठल विठ्ठल गजरी | अवघी दुमदुमली पंढरी ||१||
होतो नामाचा गजर | दिंड्या पताकांचा भार" ||२||[८]

यावरुन असे म्हणता येते की, संत चोखोबांनी विठ्ठल महिमा व तत्कालीन सामाजिक स्थितीवर परखडपणे आपल्या अभंगांतून भाष्य केले आहे. त्यामुळे संत परंपरेतील एक महत्त्वाचे संत म्हणून चोखामेळा यांच्याकडे पाहिले जाते.

**समारोप** :

प्रस्तुत शोधनिबंधात 'मराठी संतांचे व्यक्तित्व व कर्तृत्व' या विषयावर संशोधनात्मकदृष्ट्या अभ्यास करण्यात आला आहे. संत हे समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य करतात. अज्ञानी समाजाला सत्याच्या मार्गाकडे घेऊन जातात. हीच संतांची परंपरा महाराष्ट्रात बाराव्या शतकापासून सुरु असलेली

दिसते. आजही संतांचे कार्य पथदर्शी आहे. त्यामुळे सदर विषयावर शोधनिबंध सादर करीत आहे. मराठीत अनेक संत व महिला संत होऊन गेले. पण शब्दमर्यादेमुळे निवडक पाच संतांच्या व्यक्तित्व व कर्तृत्वावर संशोधनात्मक दृष्टीने प्रकाश टाकला आहे. मात्र, इतर संतांचे व्यक्तित्व व कर्तृत्व याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

**संदर्भ ग्रंथ** :

१) डॉ. बी.एन. पाटील, प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २००९, पृष्ठ क्र.२३९.
२) डॉ. ल.रा. नसिराबादकर, नवभारत, ज्ञानेश्वर विशेषांकमधील 'ज्ञानेश्वरांची सामाजिक करुणा' हा लेख, पृष्ठ क्र.१२७
३) के.ल. टेंभुर्णीकर, ज्ञानेश्वरी अध्यात्म (खंड क्रमांक २) मधील 'चांगदेव पासष्टीचे रहस्य' हा लेख, पृष्ठ क्र.५६१
४) डॉ. ल.रा. नसिराबादकर, प्राचीन वाड्.मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी सुधारित आवृत्ती, सप्टें.१९९७, पृष्ठ क्र.७३.
५) तत्रैव, पृष्ठ क्र.६७
६) तत्रैव, पृष्ठ क्र.१०१
७) संत तुकाराम अभंगगाथा, अभंग क्र.७७८
८) उनि, पुनर्मुद्रण २०१७, पृष्ठ क्र.२९५